३०७३

जा.क्र.उपनि/ठाणे ता./बी-६/औ.स./नां.रा.ठे./ /सन २०१८
उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका यांचे कार्यालय,
राष्ट्संत अचार्य श्री. पद्मसागर सूरीश्वरजी ( भवन) एम.बी.
एम. सी. बिल्डींग, शांती गार्डन, रामनगर, मिरारोड ( पुर्व)
दिनांक :- ०३/१२/२०१८

प्रति,
श्री. रामअवतार भुतरा (मुख्यप्रवर्तक)
(नियो) अंजनी रेजेन्सी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि,
जुना सर्व्हे नं.५४६/३, नविन सर्व्हे नं.३५,
हिस्सा नं. ३, मिरा भाईदर रोड, पायडा हॉटेल मार्ग,
मिरारोड (पुर्व) ता.जिल्हा ठाणे

विषय :- (नियो) अंजनी रेजेन्सी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि,, मिरारोड (पुर्व) ता,जिल्हा-ठाणे या संस्थेचे नांव राखून ठेवून बँकेत खाते उघडणेबाबत..

---

कृपया आपले लक्ष आपल्या दिनांक २४/०७/२०१८ रोजीच्या वरील विषयासंबंधीच्या पत्राकडे वेधण्यांत येवून कळविण्यांत येते की, आपले नियोजित संस्थेचे नांव (नियो) अंजनी रेजेन्सी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि, मिरारोड (पुर्व) ता,जिल्हा-ठाणे असे राखून ठेवण्यांत येत असून आपणांस नियोजित संस्थेच्या नांवाने दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा- मिरारोड (पुर्व) ता, जिल्हा-ठाणे या बँकेत खाते उघडणेसाठी परवानगी खालील अटींवर देण्यांत येत आहे .

१. नांव राखून ठेवल्यापासून तीन महिन्याचे आंत संस्थेचे नोंदणी प्रकरण या कार्यालयास सादर करावे.
२. राखून ठेवलेले नांव तीन महिन्यापर्यंत राहील. नोंदणी प्रकरण तीन महिन्याचे आंत न आल्यास नियोजित संस्थेचे नांव रद्द समजण्यांत येईल.
३. तीन महिन्यांत नोंदणी प्रकरण सादर करणे शक्य नसल्यास संयूक्तीक कारणास्तव मुदतीत मुदतवाढीसाठी अर्ज करावा.
४. नियोजित संस्थेच्या नांवाने खाते मुख्यप्रवर्तकांच्या सहीने उघडण्यांत यावे.
५. नियोजित संस्थेच्या नांवाने उघडलेल्या खात्यांतील रक्कम त्यांनी संस्था नोंदणी होऊन संस्थेच्या नावाने कारभार सुरु होई पर्यंत नोंदणी अधिका-यांच्या पूर्व परवानगी शिवाय काढण्यांत येवू नये.
६. नियोजित संस्थेस नांव राखून ठेवून बँकेत खाते उघडण्यास परवानगी दिली म्हणजे संस्था नोंदणी होईलच असे नाही, याची नोंद घ्यावी.
७. नोंदणी प्रस्ताव सादर करतेवेळी नांव राखून ठेवल्याबाबत परवानगी दिल्याबाबतची एक प्रत नोंदणी प्रस्तावाबरोबर जोडावी. तरी यापुढे संपूर्ण पत्रव्यवहार आपण नियोजित संस्थेच्या नावानेच करावा.
८. नाव राखुन ठेवण्याच्या परवानगीच्या तारखेपासुन तीन महिन्यांच्या कालावधीच्या आंत उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे यांचेकडे रितसर शासनाने निश्चित करून दिलेल्या अर्जासहित नियोजित संस्थेचा नोंदणी प्रस्ताव दाखल करावा. काही अपरिहार्य कारणांमुळे ठरवुन दिलेल्या मुदतीच्या आंत नोंदणी प्रस्ताव सादर करणे शक्य न झाल्यास नोंदणी प्रस्ताव सादर करणेसाठी या कार्यालयाकडे मुदत वाढीचा अर्ज सादर करावा."
९. नोंदणी प्रस्ताव सादर करतेवेळी नांव राखून ठेवल्याबाबत परवानगी दिल्याबाबतची एक प्रत नोंदणी प्रस्तावाबरोबर जोडावी. तरी यापुढे संपूर्ण पत्रव्यवहार आपण नियोजित संस्थेच्या नावानेच करावा.
१०. मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पूणे, यांचे कार्यालयाकडील दि. १९/०९/०९ रोजीच्या पोटनियम दुरुस्ती आदेशान्वये प्रत्येक सभासदांने भागभांडवलापोटी प्रत्येकी अधिमुल्य रु.१००/- चे
१० भाग (शेअर्स) असे एकूण रु.५००/- व प्रवेश फी पोटी रु.१००/- असे एकूण रु.६००/- (अक्षरी रुपये साहशे मात्र) भरुन घेण्यांत यावे.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे.

प्रत:- शाखा व्यवस्थापक,
ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा- मिरारोड (पुर्व) ता, जिल्हा-ठाणे

उपनिबंधक,
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे.